Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## परिपत्रक

**विषय : बी.ए. व बी. कॉम. भाग ३ या पाठयक्रमांच्या स्वयंअध्ययन साहित्य वितरणाबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२६ – २०२७ पासून बी. ए. व बी. कॉम भाग ३ या पाठयक्रमांना सुधारित अभ्यासक्रम लागू झाले आहेत. सदर सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील बी.ए. व. बी.कॉम भाग ३ चे स्वयंअध्ययन साहित्य सुधारित करण्यात येत आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले खालील स्वयंअध्ययन साहित्य शैक्षणिक वर्ष २०२६ – २०२७ पासून लागू झालेल्या बी. ए. भाग ३ च्या सुधारित अभ्यासक्रमाला उपयुक्त आहे.

| अ.क्र | स्वयंअध्ययन साहित्य | शेरा |
|---|---|---|
| १ | **बी. ए. भाग ३ समाजशास्त्र :** सत्र ५ पाश्चात्य समाजशास्त्रीय विचारवंत सत्र ६ भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत | – |
| २ | **बी. ए. भाग ३ इतिहास :** पेपर ७ व पेपर १२ प्राचीन भारताचा इतिहास | – |
| ३ | **बी. ए. भाग ३ इतिहास :** सत्र ५ पेपर ९ आधुनिक जगाचा इतिहास (१८ ते १९ वे शतक) सत्र ६ आधुनिक जगाचा इतिहास (२० वे शतक) | – |
| ४ | **बी. ए. भाग ३ इतिहास :** सत्र ५ पेपर १० मराठा साम्राज्याचा इतिहास उदय आणि दृढीकरण सत्र ६ पेपर १५ मराठा सामाज्याचा विस्तार व ऱ्हास | – |
| ५ | **बी. ए. भाग ३ इतिहास :** 'पेपर ८ व पेपर १३ मध्ययुगीन भारताचा इतिहास' | सुधारित अभ्यासक्रमानुसार सदर स्वयंअध्ययन साहित्याच्या सत्र ६ च्या घटक क्रमांक १ मध्ये एक उपघटक नव्याने समाविष्ट करण्यात आला असून तो विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे त्याबाबतची सूचना आपल्या अभ्यास केंद्रावरुन प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात यावी. |

वरील स्वयं अध्ययन साहित्याशिवाय इतर कोणतेही स्वयंअध्ययन साहित्य शैक्षणिक वर्ष २०२६ – २०२७ पासून लागू झालेल्या बी. ए. व बी. कॉम भाग ३ च्या सुधारित अभ्यासक्रमास उपयुक्त नाहीत. त्यामुळे उपरोक्त स्वयंअध्ययन साहित्या व्यतिरिक्त बी.ए. व बी. कॉम भाग ३ मधील इतर पेपरच्या स्वयंअध्ययन साहित्याच्या प्रती आपल्या अभ्यासकेंद्रावर शिल्लक असलेस त्या शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ मध्ये आपल्या अभ्यास केंद्रावरुन प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना **वितरीत करु नयेत.** बी. ए. भाग ३ व बी. कॉम भाग ३ च्या स्वयंअध्ययन साहित्याबाबतची अद्ययावत व सविस्तर माहिती वेळोवेळी आपणास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

Bhinde

उपकुलसचिव

संदर्भ : शिवाजी वि/सीडीओई/२०२६–२०२७/607
दिनांक : 18 AUG 2026

प्रति,

१. मा.केंद्रप्रमुख/केंद्र समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची सर्व अभ्यास केंद्रे
२. मा.व्यवस्थापक, कंझ्युमर्स स्टोअर्स, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
३. प्रशासकीय विभाग, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
४. मा समन्वयक, सातारा व सांगली विभागीय केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर